डॉ. श्री. बांदल विठ्ठल श्रीरंग यांची प्राध्यापक, विद्युत अभियांत्रिकी, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, महाराष्ट्र अभियांत्रिकी महाविद्यालयीन शिक्षकीय सेवा (गट-अ) या पदावरील नियुक्ती रद्द करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन

उच्च व तंत्र शिक्षण विभाग

शासन निर्णय क्रमांकः उवतंशि/तांशि -१/३३/१२/(१२५/१३)/भाग-१

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,

मंत्रालय विस्तार, मुंबई -४०० ०३२.

दिनांक -: १८ डिसेंबर, २०१७

संदर्भ :- उच्च व तंत्र शिक्षण विभाग शासन निर्णय क्रमांकः उवतंशि/तांशि -१/३३/१२/१२५/१३, दि. ०६/०१/२०१७

प्रस्तावना-:

महाराष्ट्र लोकसेवा आयोग पुरस्कृत उमेदवार डॉ. श्री. बांदल विठ्ठल श्रीरंग, यांची प्राध्यापक, विद्युत अभियांत्रिकी, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, महाराष्ट्र अभियांत्रिकी महाविद्यालयीन शिक्षक सेवा (गट-अ) या पदावर शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, कराड येथे संदर्भाधीन शासन निर्णयान्वये नियुक्ती करण्यात आली होती. तसेच सदर नियुक्ती आदेशामध्ये उमेदवाराने संबंधीत पदावर आदेशाच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत रुजू व्हावे, असे नमूद करण्यात आले होते. तथापि श्री. बांदल, यांनी केलेल्या विनंतीस अनुसरून उपरोक्त पदावर रुजू होण्यास त्यांना दि. ३०/०८/१७ पर्यंत अंतिम मुदतवाढ देण्यात आलेली होती. त्यानुसार श्री. बांदल यांनी दि. ३०/०८/१७ पर्यंत रुजू होणे आवश्यक होते. तथापि, ते सदर पदावर अद्यापपर्यंत रुजू झाले नाहीत. त्यामुळे श्री. बांदल यांची प्राध्यापक, विद्युत अभियांत्रिकी या पदावरील नियुक्ती रद्द करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय -:

महाराष्ट्र लोकसेवा आयोग पुरस्कृत उमेदवार श्री. बांदल विठ्ठल श्रीरंग यांची प्राध्यापक, विद्युत अभियांत्रिकी, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, महाराष्ट्र अभियांत्रिकी महाविद्यालयीन शिक्षक सेवा (गट-अ) या पदावर शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, कराड येथे संदर्भाधीन शासन निर्णयान्वये करण्यात आलेली नियुक्ती या आदेशान्वये रद्द करण्यात येत आहे.

२. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१७१२१८१३२२२९९६०८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Sameer Laxman Dhere

Digitally signed by Sameer Laxman Dhere
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Higher And Technical Education Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=e6ab4a357b0e2247b4328b57f45f509bf1bf0bd20c865128a018421c354bddc5, serialNumber=6ee64cf9b42881125c3715a5db341b5827c5743c728bc85f04bb71ff8fc154d6, cn=Sameer Laxman Dhere
Date: 2017.12.18 13:29:12 +05'30'

(समीर ढेरे)

कार्यासन आधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,

डॉ. श्री. बांदल विठ्ठल श्रीरंग, प्राचार्य, शासकीय तंत्रनिकेतन, कराड, जि. सातारा-४१५ १२४.

प्रत,

१. मा. मंत्री, उच्च व तंत्रशिक्षण यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
२. संचालक, तंत्रशिक्षण, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
३. सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई.
४. प्र. सह संचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे.
५. प्राचार्य, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, कराड, जि. सातारा.
६. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परीक्षा) महाराष्ट्र-१- मुंबई.
७. जिल्हा कोषागार अधिकारी, सातारा.
८. अप्पर मुख्य सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.
९. निवड नस्ती (तांशि-१).